जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 OCT 2024 पुढारी

# शिवाजी विद्यापीठासह सर्व महाविद्यालयांमध्ये एकाच वेळी शिवराज्याभिषेकाचा स्मृतिजागर

## वाचन प्रेरणा दिनाच्या अनोख्या उपक्रमात हजारो विद्यार्थ्यांचा सहभाग

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

'या युगीं सर्व पृथ्वीवर म्लेंच्छ बादशहा. मऱ्हाटा पातशहा येवढा छत्रपती जाला, ही गोष्ट काही सामान्य जाली नाही...' छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक सोहळ्याचे प्रत्यक्षदर्शी बखरकार कृष्णाजी अनंत सभासद यांनी सोहळ्याचे महत्त्व विशद करणारे विधान केले. आज वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने शिवाजी विद्यापीठासह संलग्नित २९७ महाविद्यालयांतील हजारो विद्यार्थी, शिक्षक व कर्मचाऱ्यांनी सकाळी पंधरा मिनिटे कालावधीत शिवराज्याभिषेक दिनाच्या स्मृतींचा जागर केला.



कोल्हापूर : वाचन प्रेरणा दिन कार्यक्रमात शिवराज्याभिषेकाशी संबंधित उताऱ्यांचे मूकवाचन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील. सोबत डॉ. तानाजी चौगुले, डॉ. रघुनाथ ढमकले, डॉ. व्ही.एन. शिंदे, डॉ. धनंजय सुतार. (छाया : नाज ट्रेनर)

शिवाजी विद्यापीठातर्फे दरवर्षी भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त यंदाच्या वर्षापासून वाचन प्रेरणा दिन उपक्रम विद्यापीठासह सर्व संलग्नित महाविद्यालयांत एकावेळी राबविला. यावर्षी छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५० व्या राज्याभिषेक सोहळ्याचे औचित्य साधून स्मृती जागविल्या.

दरम्यान, शिवाजी विद्यापीठात सकाळी साडेदहा वाजता कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून जयंतीनिमित्त अभिवादन केले. त्यानंतर राजर्षी शाहू सभागृहात सर्व अधिकारी, डॉ. सदानंद मोरे संपादित 'शिवराज्याभिषेक' या ग्रंथातील सोहळ्याशी संबंधित उताऱ्यांचे मूकवाचन केले. वाचन प्रेरणा दिन समितीचे अध्यक्ष डॉ. रघुनाथ ढमकले यांनी स्वागत केले. राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले यांनी आभार मानले.

यावेळी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. धनंजय सुतार, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. सरिता ठकार, डॉ. सागर डेळेकर उपस्थित होते.

17 OCT 2024 सिंधुदुर्ग समाचार दि. १७/१०/२०२४

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठासह सर्व महाविद्यालयांत एकाच वेळी शिवराज्याभिषेकाचा स्मृतीजागर




कोल्हापूर/प्रतिनिधी :

'या युगी सर्व पृथ्वीवर म्लेच्छ बादशाहा. मऱ्हाटा पातशहा येवढा छत्रपती जाला, ही गोष्ट काही सामान्य जाली नाही...' छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक सोहळ्याचे प्रत्यक्षदर्शी बखरकार कृष्णाजी अनंत सभासद यांनी या सोहळ्याचे महत्त्व विषद करणारे उपरोक्त विधान केले. आज वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने शिवाजी विद्यापीठासह संलग्नित २९७ महाविद्यालयांतील हजारो विद्यार्थी, शिक्षक आणि कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून सकाळी १०.४५ ते ११.०० या पंधरा मिनिटांच्या कालावधीत शिवराज्याभिषेक दिनाच्या स्मृतींचा जागर करण्यात आला.

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने दरवर्षी भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात येतो. गेल्या वर्षापासून त्याची व्याप्ती महाविद्यालयांपर्यंत वाढवून सर्व संबंधित घटकांना सामावून घेऊन वाचन प्रेरणा दिन साजरा करण्याचे नियोजन करण्यात आले. आज सकाळी १०.३० ते ११ वा. या कालावधीत हा उपक्रम विद्यापीठासह सर्व संलग्नित महाविद्यालयांत एकाच वेळी राबविण्यात आला. यंदाच्या वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने यावर्षी छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५० व्या राज्याभिषेक सोहळ्याचे औचित्य साधून महाराजांच्या राज्याभिषेक सोहळ्याचे वर्णन असणारा मजकूर विद्यापीठामार्फत सर्व अधिविभाग व महाविद्यालयांना पाठविण्यात आला. याच मजकुराचे १०.४५ ते ११ वाजेपर्यंतच्या कालावधीत वाचन करून विद्यापीठ परिक्षेत्रातील सर्व शिक्षक, विद्यार्थी, अधिकारी व कर्मचारी आदी संबंधित घटकांनी शिवराज्याभिषेकाच्या स्मृती जागविल्या.

शिवाजी विद्यापीठात सकाळी ठीक साडेदहा वाजता कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. त्यानंतर विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी एकत्र जमून डॉ. सदानंद मोरे संपादित 'शिवराज्याभिषेक' या ग्रंथातील सोहळ्याशी संबंधित उताऱ्यांचे मूकवाचन केले. वाचन प्रेरणा दिन समितीचे अध्यक्ष व व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रघुनाथ ढमकले यांनी स्वागत करून उपक्रमाचा हेतू विषद केला. राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले यांनी आभार मानले. या कार्यक्रमास कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, मानव्यशास्त्र विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार, आंतरविद्याशाखीय अधिष्ठाता डॉ. ... आजीवन अध्ययन व विस्तार/दूरशिक्षण ... (see note) संचालक डॉ. सागर डेळेकर, डॉ. मच्छिंद्र गोफणे, डॉ. शिवराज थोरात, डॉ. प्रकाश बिलावर, डॉ. गजेंद्र खामकर, डॉ. के.डी. कुचे, डॉ. एस.एस. कुंभार, डॉ. जे.पी. खराडे, डॉ. जे.पी. भोसले, एस.डी. थिटे यांच्यासह अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अधिविभागांसह महाविद्यालयांतही विविध उपक्रम

वाचन प्रेरणा दिनाचा हा उपक्रम विद्यापीठाच्या सर्व अधिविभागांसह संलग्नित महाविद्यालयांतही मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. महाविद्यालयांनी आपापल्या परिसरात ग्रंथदिंडीसह अनेकविध उपक्रम राबविले. महाविद्यालयांतील सभागृहे, मैदाने यांसह विविध वर्गांमध्येही सकाळी १०.३० ते ११ या वेळेत विद्यार्थी व शिक्षकांनी एकत्रितपणे शिवराज्याभिषेकाशी संबंधित उताऱ्यांचे वाचन केले.

17 OCT 2024

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

epaper : www.sindhudurgsamachar.com
Mahrashtra : 9422043543 Goa : 9673153300 Karnataka : 9422043300

# सिंधुदुर्ग समाचार

कोल्हापूर

ाऊसाहेब कदम

सिंधुदुर्ग समाचारचाअंक आपल्या मोबाईलवर पाहण्यासाठी वरील क्युआर कोड स्कॅन करा.

Posted at RMS Kolhapur Postal Reg No : KLR/170/2024-2026

२०२४ ● पाने ४ ● वर्ष ३४ ● अंक २३७ ● कोल्हापूर, सिंधुदुर्ग, मुंबई, रत्नागिरी, सांगली, सातारा, बेळगाव, गोवा येथून प्रसिध्द ● e-mail: klpsindhu@gmail.com ● RNI NO : MAHMAR/2006/17335 ● किंमत १ ●

## वाचनामुळेच माणूस अधिक प्रगल्भ : नंदकुमार मोरे



कोल्हापूर/प्रतिनिधी :

वाचनामुळेच माणूस अधिकाधिक प्रगल्भ बनतो, असे प्रतिपादन मराठी विभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाचा मराठी अधिविभाग आणि महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने वाचन प्रेरणा दिनानिमित्त आयोजित साहित्यकृतींचे अभिवाचन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

डॉ. मोरे म्हणाले, आज मोबाईलच्या युगात वाचन कमी झाले असून विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावण्यासाठी चांगले साहित्य वाचले पाहिजे, तरच आपण समृद्ध होऊ शकतो.

डॉ. रणधीर शिंदे म्हणाले की, वाचन ही आनंद देणारी गोष्ट आहे. आपण अनेक चांगल्या साहित्यकृतींचे वाचन केले पाहिजे. त्या दृष्टीने विद्यार्थ्यांनी काय वाचले पाहिजे, याविषयीही त्यांनी मार्गदर्शन केले.

सदर साहित्यकृतींचे अभिवाचन कार्यक्रमांतर्गत मराठीतील निवडक साहित्यकृतींचे वाचन विद्यार्थ्यांनी केले. त्यामध्ये योगिता टोंबरे (नदीष्ट-मनोज बोरगावकर), प्रज्योती शिंदे (झाडवाटा-आनंद यादव), पृथ्वीराज पाटील (ढव्ह आणि लख्ख ऊन-राजन गवस), जय वाचनकर (डिगर तुकोबा-विनायक होगाडे), संजना शेरखाने (एक पत्र भाईसाठी-सुनिता देशपांडे), प्रमोदिनी पुंगावकर (पानो-चिं.त्र्यं.खानोलकर), प्रांजली क्षिरसागर (माझ्या इंग्रजीचे बोलू कौतुके-मंगला गोडबोले), हिना दळवी (पर्स हरवलेली बाई-मंगला गोडबोले), स्मिता राजमाने (संगीत देवबाभळी-प्राजक्त देशमुख), ज्योती चौरे (भुरा-शरद बाविस्कर), ऋणाली नांद्रेकर (आहे हे असं आहे-गौरी देशपांडे), करुणा उकीरडे (आता अमोद सुनासि आले-दि.बा.मोकाशी) या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी अभिवाचनात सहभाग घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ऋतुजा पारदे तर डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले. या कार्यक्रमासाठी एम.ए. भाग एक-दोन आणि संशोधक विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
17 OCT 2024
लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'वाचनामुळेच माणूस अधिक प्रगल्भ'

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : वाचनामुळेच माणूस अधिकाधिक प्रगल्भ बनतो, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी केले. मराठी अधिविभाग आणि महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांच्यावतीने वाचन प्रेरणा दिनानिमित्त आयोजित साहित्यकृतींचे अभिवाचन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

डॉ. मोरे म्हणाले, आज मोबाईलच्या युगात वाचन कमी झाले असून, विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावण्यासाठी चांगले साहित्य वाचले पाहिजे, तरच आपण समृद्ध होऊ शकतो. डॉ. रणधीर शिंदे म्हणाले,- वाचन ही आनंद देणारी गोष्ट आहे. आपण अनेक चांगल्या साहित्यकृतींचे वाचन केले पाहिजे. त्या दृष्टीने विद्यार्थ्यांनी काय वाचले पाहिजे, याविषयीही त्यांनी मार्गदर्शन केले. मराठीतील निवडक साहित्यकृतींचे वाचन विद्यार्थ्यांनी केले.

1 7 OCT 2024

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# यशस्वी होण्यासाठी संवाद कौशल्य महत्त्वाचे : डॉ. जोगदंड

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

आजचे हे जग निव्वळ स्पर्धेचे नसून ते संवाद कौशल्य, सादरीकरण, तंत्रज्ञान आणि व्यवस्थापनविषयक ज्ञान मिळवण्याचे आहे. विद्यार्थ्यांनी यशस्वी होण्यासाठी ते आत्मसात केले पाहिजे. सकारात्मक विचाराने प्रेरित होऊन अभ्यासात सातत्य, जिद्द, चिकाटी आणि कष्ट केल्यास यशप्राप्ती शक्य आहे, असे प्रतिपादन पुणे येथील 'यशदा'चे संशोधन अधिकारी डॉ. बबन जोगदंड यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या स्पर्धा परीक्षा आणि मार्गदर्शन केंद्रातर्फे मानव्यशास्त्र सभागृहात 'स्पर्धा परीक्षा आणि नोकरीच्या संधी' या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते.



**शिवाजी विद्यापीठात आयोजित विशेष व्याख्यानात बोलताना डॉ. बबन जोगदंड.**

डॉ. जोगदंड म्हणाले, परीक्षार्थींनी राजहंसाप्रमाणे नीर-क्षीर विवेकवृत्तीने आवश्यक तेच ज्ञान प्राशन करण्याची कला आत्मसात करणे अनिवार्य ठरते. स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी भीती आणि न्यूनगंड बाळता कामा नये. विद्यार्थ्यांनी वर्तमानपत्रांचे बारकाईने वाचन केले पाहिजे. वक्तृत्व व लेखनशैली सुधारणेही गरजेचे आहे. या पद्धतीने अभ्यासाचा क्रम ठेवल्यास यशाचा मार्ग सुकर होतो.

कार्यक्रमास रसायनशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. कैलास सोनवणे यांची विशेष उपस्थिती होती. स्पर्धा परीक्षा आणि मार्गदर्शन केंद्राचे समन्वयक डॉ. जगन कराडे यांनी प्रास्ताविक केले. पवन कांबळे यांनी सूत्रसंचालन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 OCT 2024
लोकमत

# यशस्वी होण्यासाठी संवादकौशल्य महत्त्वाचे

## बबन जोगदंड : विद्यापीठात व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : आजचे जग निव्वळ स्पर्धेचे नसून ते संवाद कौशल्य, सादरीकरण, तंत्रज्ञान, व्यवस्थापन विषयक ज्ञान मिळविण्याचे आहे. विद्यार्थ्यांनी यशस्वी होण्यासाठी ते आत्मसात केले पाहिजे, असा कानमंत्र पुणे येथील 'यशदा'चे संशोधन अधिकारी डॉ. बबन जोगदंड यांनी मंगळवारी विद्यार्थ्यांना दिला.



शिवाजी विद्यापीठाच्या स्पर्धा परीक्षा आणि मार्गदर्शन केंद्राच्या वतीने मानव्यशास्त्र सभागृहात 'स्पर्धा परीक्षा आणि नोकरीच्या संधी' या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. रसायनशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. कैलास सोनवणे यांची विशेष उपस्थिती होती.

डॉ. जोगदंड म्हणाले, परीक्षार्थींनी राजहंसाप्रमाणे नीर-क्षीर विवेकवृत्तीने आवश्यक तेच ज्ञान प्राशन करण्याची कला आत्मसात करणे अनिवार्य ठरते. स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी भीती आणि न्यूनगंड बाळगता कामा नये. जर्मन, फ्रेंच, जपानी या भाषा कौशल्यांसह पर्यटन आणि कार्यक्रम व्यवस्थापनाचेही उत्तम ज्ञान असणे आवश्यक आहे. स्पर्धा परीक्षेची तयारी करताना विद्यार्थी किती अंतर कापतो, यापेक्षा तो कोणत्या दिशेने जातो, याला खूप महत्त्व असते. विद्यार्थ्यांनी वर्तमानपत्रांचे बारकाईने वाचन केले पाहिजे. डॉ. जगन कराडे यांनी स्वागत केले. पवन कांबळे यांनी सूत्रसंचालन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 OCT 2024
सकाळ

# सध्याचे जग संवाद कौशल्य, सादरीकरणाचे ज्ञान मिळविण्याचे

## डॉ. जोगदंड : शिवाजी विद्यापीठातील व्याख्यान

कोल्हापूर, ता. १६ : 'सध्याचे जग हे निव्वळ स्पर्धेचे नसून ते संवाद कौशल्य, सादरीकरण, तंत्रज्ञान आणि व्यवस्थापनविषयक ज्ञान मिळविण्याचे आहे. विद्यार्थ्यांनी यशस्वी होण्यासाठी ते आत्मसात केले पाहिजे', असे प्रतिपादन पुणे येथील 'यशदा'चे संशोधन अधिकारी डॉ. बबन जोगदंड यांनी मंगळवारी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या स्पर्धा परीक्षा आणि मार्गदर्शन केंद्रातर्फे मानव्यशास्त्र सभागृहात 'स्पर्धा परीक्षा आणि नोकरीच्या संधी' या विषयावर त्यांचे व्याख्यान झाले. रसायनशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. कैलास सोनवणे प्रमुख उपस्थित होते.

डॉ. जोगदंड म्हणाले, 'परीक्षार्थींनी राजहंसाप्रमाणे नीर-क्षीर विवेकवृत्तीने आवश्यक तेच ज्ञान प्राशन करण्याची कला आत्मसात



डॉ. जोगदंड

करणे अनिवार्य ठरते. स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी भीती आणि न्यूनगंड बाळगता कामा नये. पुस्तके स्वतः शांत राहून व्यक्तीस बोलायला, जगायला शिकवितात आणि आत्मविश्वास देतात. आज प्रचंड संसाधने उपलब्ध आहेत, त्यांचा उत्तम उपयोग करून घेता आला पाहिजे. विद्यार्थ्यांनी वर्तमानपत्रांचे बारकाईने वाचन केले पाहिजे. सकारात्मक विचाराने प्रेरित होऊन अभ्यासात सातत्य, जिद्द, चिकाटी आणि कष्ट केल्यास यशप्राप्ती शक्य आहे.' स्पर्धा परीक्षा आणि मार्गदर्शन केंद्राचे समन्वयक डॉ. जगन कराडे यांनी प्रास्ताविक केले. पवन कांबळे यांनी सूत्रसंचालन केले.

17 OCT 2024
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शैक्षणिक सामग्रीसाठी 'एआय'चा वापर महत्त्वाचा

**डॉ. राजेंद्र पारिजात**

**कोल्हापूर :** वैयक्तिक गरजेनुसार शैक्षणिक सामग्री तयार करण्यासाठी 'एआय'चा (कृत्रिम बुद्धिमत्ता) वापर महत्त्वाचा आहे, असे प्रतिपादन सायबर इन्स्टिट्यूट येथील सहयोगी प्राध्यापक डॉ. राजेंद्र पारिजात यांनी केले. शिवाजी विद्यापीठातर्फे विविध साहित्यिक, विचारवंत यांच्या नावे सुरू असलेल्या अध्यासन व केंद्रे यासाठी दोनदिवसीय पी. एम. उषा : सॉफ्ट कॉम्पोनंट ओडिएल अँड मुक्स प्रोग्रॅम अंतर्गत ई-कन्टेन्ट विकसन कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते.

डॉ. पारिजात म्हणाले, स्वयंचलित चालणारी साधने



कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी बोलताना डॉ. राजेंद्र पारिजात.

वापरामुळे भाषांतर, प्रश्नमंजुषा आणि मूल्यांकनांची निर्मिती यासारख्या काही प्रक्रिया गतिशील होण्यास व वेळ वाचण्यास मदत झाली आहे. ई-कन्टेन्ट बनवताना शैक्षणिक पैलूंवर अधिक लक्ष केंद्रीत केले पाहिजे. शैक्षणिक सामग्रीचे परिवर्तन करण्यासाठी एआय मदत करते. तसेच धोरणात्मक सहयोग आणि अनुकूलनाद्वारे तांत्रिक आणि नैतीक अडथळ्यांवर मात करण्याचे काम देखील करते.

डॉ. पारिजात यांनी संत कबीर यांच्यावर बनवलेला ई-कन्टेन्ट यावेळी सादर केला. तसेच कराड येथील कृष्णा अभिमत विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक डॉ. बी. डी. दामले म्हणाले, ई-कन्टेन्टचे विविध पैलू आहेत. त्याचे विविध सादरीकरणाचे टप्पे आहेत. ऑनलाईन प्लॅटफॉर्म फक्त विद्यार्थ्यांसाठी नसून तो सर्व घटकांसाठी आहे. ई-कन्टेन्ट निर्मितीसाठी उपयोगात आणणारी स्क्रिप्टच्या बाबतीत दोन प्रकार पडतात. एक शैक्षणिक आणि दोन प्रसंगांवर आधारित आहेत. स्क्रिप्टस् लेखकांची व सादरीकरण करणाऱ्यांची फळी निर्माण केली पाहिजे.

यावेळी उपकुलसचिव व्ही. बी. शिंदे, डॉ. आर. ए. कुंभार, डॉ. टी. आर. गुरव, डॉ. अविनाश भाले, डॉ. कुलदीप उंदरे आदी प्रमुख उपस्थित होते. प्रास्ताविक संचालक डॉ. के. बी. पाटील यांनी केले. प्रमुख पाहुण्यांची ओळख डॉ. चांगदेव बंडगर यांनी करून दिली. सूत्रसंचालन डॉ. नितीन रणदिवे यांनी केले. डॉ. सचिन भोसले यांनी आभार मानले.

17 OCT 2024
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

हॅलो प्रभात

# शैक्षणिक सामग्री तयार करण्यासाठी ए.आय.चा वापर महत्वाचा

## डॉ.राजेंद्र पारिजात

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

वैयक्तिकगरजेनुसारशैक्षणिक सामग्री तयार करण्यासाठी ए.आय. (कृत्रिम बुद्धिमत्ता) चा वापर महत्वाचा असल्याचे प्रतिपादन सायबर इन्स्टिट्यूट येथील सहयोगी प्राध्यापक डॉ.राजेंद्र पारिजात यांनी केले. शिवाजी



विद्यापीठाच्या वतीनेविविध साहित्यिक, विचारवंत यांचे नावे सुरु असलेल्या अध्यासन व केंद्रे यासाठी दोनदिवशीय पी.एम.उषा : सॉफ्ट कॉम्पोनन्ट ओडिएल अँड मुक्स प्रोग्रॅम अंतर्गत ई –कन्टेन्टविकसन कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. यावेळी उपकुलसचिव व्ही.बी. शिंदे, डॉ.आर.ए.कुंभार, डॉ.टी. आर.गुरव, डॉ. अविनाश भाले, डॉ.कुलदीप उंदरे यांसह शिवाजी विद्यापीठातीलविविध केंद्र व अध्यासनामधील विषय तज्ज्ञ व शिक्षक उपस्थित होते. यावेळी स्वागत व प्रास्ताविक संचालक डॉ. के.बी.पाटील यांनी केले. प्रमुख पाहुण्यांची ओळख डॉ.चांगदेव बंडगर यांनी करून दिली. सूत्रसंचालन डॉ.नितीन रणदिवे यांनी केले. डॉ.सचिन भोसले यांनी आभार मानले.

17 OCT 2024
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आयात-निर्यातविषयक उद्योगांत रोजगाराच्या संधी

## डॉ. ओंकार माळी : विद्यापीठात समाजशास्त्र अधिविभागातर्फे कार्यशाळा

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १६ : आयात आणि निर्यातविषयक उद्योगांमध्ये रोजगाराच्या अनेक संधी आहेत. कष्ट करण्याची तयारी असणाऱ्या युवकांनी यामध्ये उतरावे, असे आवाहन उद्यमी महाराष्ट्र संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष डॉ. ओंकार हरी माळी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचा समाजशास्त्र अधिविभाग, इनोव्हेशन, इन्क्युबेशन अँड लिंकेजेस केंद्र आणि शिवाजी युनिव्हर्सिटी रिसर्च अँड डेव्हलपमेंट फाउंडेशनतर्फे आयोजित 'आयात-निर्यात' या



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित कार्यशाळेत बोलताना डॉ. ओंकार माळी. यावेळी डावीकडून डॉ. प्रकाश राऊत, सागर डेळेकर, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रतिमा पवार, प्रल्हाद माने आदी.

विषयावर त्यांचे व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील होते. डॉ. माळी म्हणाले, 'आयात-निर्यात व्यवसायाचे उद्योग क्षेत्रात महत्त्वाचे स्थान आहे. देशासह महाराष्ट्रासोबत स्वतःचा आर्थिक व सामाजिक विकास साधण्यासाठी या क्षेत्रामध्ये तरुणांनी करिअर करण्यासाठी पुढे यावे. त्यासाठी कंपनी रजिस्ट्रेशन, आवश्यक परवाने, टर्म्स पेमेंट-अॅडव्हान्स पेमेंट आदी तांत्रिक बाबींचा योग्य अभ्यास गरजेचा आहे.' प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, 'विद्यार्थ्यांनी नोकरी व सेवा क्षेत्रापलीकडे चाकोरीबाहेरील उद्योग-व्यवसायांमधील करिअर संधींचा विचार करावा. शिक्षण घेत असतानाच अशा संधींचा शोध घेणे आणि त्यासाठी आवश्यक तयारी करायला हवी.'

डॉ. सागर डेळेकर, प्रकाश राऊत, जगन कराडे, प्रल्हाद माने, राजेंद्र सोनकवडे उपस्थित होते. समाजशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. प्रतिमा पवार यांनी स्वागत केले. मयुरेश पाटील यांनी परिचय करून दिला. आकाश ब्राह्मणे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. प्रतिमा देसाई यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 OCT 2021
सकाळ

# 'नेचर सायंटिफिक'च्या समीक्षकपदी डॉ. माने



डॉ. राहुल माने

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या औद्योगिक रसायनशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ. राहुल माने यांची आंतरराष्ट्रीय 'नेचर सायंटिफिक रिपोर्ट्स 'या जर्नलसाठी समीक्षकपदी निवड झाली आहे. ही निवड त्यांच्या संशोधन क्षेत्रातील अनुभव, कामगिरीची दखल घेऊन करण्यात आली आहे. 'नेचर सायंटिफिक रिपोर्ट्स 'हे जगातील अग्रगण्य वैज्ञानिक जर्नल्सपैकी एक आहे. ते संशोधन लेखांच्या तज्ज्ञ समीक्षेसाठी ओळखले जाते. डॉ. माने हे औद्योगिक रसायनशास्त्र विभागात गेली चौदा वर्षे सहायक प्राध्यापक म्हणून काम करत आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 OCT 2024
सकाळ

# विश्वकोश निर्मिती मंडळाच्या सदस्यपदी डॉ. रणधीर शिंदे

कोल्हापूर, ता. १६ : शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागातील प्राध्यापक डॉ. रणधीर शिंदे यांची महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाच्या सदस्यपदी निवड झाली आहे.

या मंडळाची शासनाच्या मराठी भाषा विभागाने पुनर्रचना केली आहे. त्यात अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सदस्य असा २५ जणांचा नव्याने समावेश केला आहे. त्यातील सदस्यपदी डॉ. शिंदे यांची निवड झाली आहे. त्यांना पहिल्यांदाच या मंडळामध्ये काम करण्याची संधी



मिळाली आहे. ते अठरा वर्षे विद्यापीठातील मराठी विभागात कार्यरत आहेत. समीक्षक म्हणून त्यांची विशेष ओळख आहे. त्यांनी यापूर्वी दोनवेळा महाराष्ट्र साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या सदस्य म्हणून काम केले आहे. विश्वकोश निर्मिती मंडळाच्या मराठी साहित्य ज्ञानमंडळाचे समन्वयक म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली आहे.